निर्मिती...गीत १३ ऑगस्टला प्रसारित होणार

# आशा फाउंडेशनने तयार केले 'मी एक निनावी मावळा' गीत

प्रतिनिधी | जळगाव

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत 'हर घर तिरंगा' अभियान राबवण्यात येत आहे. या अंतर्गत आशा फाउंडेशनतर्फे या अभियानात वेगळ्याप्रकारे सहभागी होण्यासाठी 'मी एक निनावी मावळा' हे देशभक्तीपर गीत तयार केले आहे. या गीतामुळे सैनिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त होत आहे.

आशा फाउंडेशनतर्फे तयार करण्यात आलेले 'मी एक निनावी मावळा' हे गीत १३ ऑगस्ट रोजी प्रसारित करण्यात येणार आहे. एक आठवड्यात दहा लाख नागरिकांनी हे गीत ऐकावे, पहावे असे उद्दिष्ट संस्थेने ठेवले आहे. आपलं कुटुंब, माय असा संकुचित विचार न करता मातृभूमीची सेवा करत भारताचे स्वातंत्र्य, सुरक्षा आणि स्थैर्य अबाधित राखण्यासाठी सैनिक झटत असतात. या सैनिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हे गीत तयार करण्यात आले आहे. या गीतामुळे वेगळी स्फूर्ती निर्माण होत असल्याचे आशा फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.